तीर्थक्षेत्रांचे माहात्म्य आणि दुःस्थिती : खंड १

# तीर्थक्षेत्रे आणि तीर्थयात्रा यांचे महत्त्व

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्‌घोष करणारे**
**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सद्‌गुरु डॉ. चारुदत्त प्रभाकर पिंगळे**
राष्ट्रीय मार्गदर्शक, हिंदु जनजागृती समिती



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४३, इंग्रजी २०१, कन्नड १९७, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**जानेवारी २०२४ पर्यंत ३६४ ग्रंथांच्या १३ भाषांत ९५ लाख ७५ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १०.१.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०४९ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## सद्गुरु डॉ. चारुदत्त पिंगळे, एम्.एस्. (ई.एन्.टी.)



‘हिंदु जनजागृती समिती’चे राष्ट्रीय मार्गदर्शक असून भारत आणि नेपाळ या देशांत हिंदु राष्ट्र-स्थापनेसाठी हिंदूसंघटन करतात. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रतिवर्षी गोवा येथे ‘अ.भा. हिंदू अधिवेशन’ आयोजित केले जाते. ते सनातनच्या अनेक ग्रंथांचे संकलकही आहेत.

---

## अनुक्रमणिका

**(प्रकरणांतील काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**

**प्रकरण १ : तीर्थक्षेत्रांची सर्वसाधारण माहिती** १०

१. तीर्थ २. तीर्थक्षेत्रे १०

४. स्मशान, घर, तीर्थक्षेत्र, संतांचा आश्रम इत्यादींतील त्रिगुणांचे प्रमाण २९

६. पुण्यक्षेत्रांची वैशिष्टे, प्रमुख कार्य, कार्यरत शक्ती अन् प्रमुख योगमार्ग ३३

९. इतर पंथियांची तीर्थक्षेत्रे आणि हिंदूंची तीर्थक्षेत्रे ४१

**प्रकरण २ : तीर्थक्षेत्रांची निर्मिती** ४३

१. तीर्थक्षेत्राची निर्मिती कशी होते ? ४३

२. तीर्थक्षेत्रांचा शोधक भगवान परशुराम ४३

४. संत, गुरु, सद्गुरु यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी तीर्थक्षेत्र बनणे ४४

५. संत अन् ऋषीमुनी यांच्या तपश्चर्येमुळे पावन तीर्थक्षेत्रे बनणे ४४

६. ८० टक्के आध्यात्मिक स्तर असलेल्या संतांचे स्थान ४४

७. पुण्यवान व्यक्ती आणि संत यांचे समाधीस्थान ४५

८. धर्मकार्य करणाऱ्या समाजव्यवस्थेच्या ठिकाणी तीर्थक्षेत्र निर्माण होणे ४५

**प्रकरण ३ : तीर्थक्षेत्रांचे महत्त्व** ४६

१. चैतन्य २.पापमुक्ती ३. चित्तशुद्धी ४. सत्संग ४६

८. तीर्थक्षेत्रांच्या संदर्भात भारताचे महत्त्व ४९

**प्रकरण ४ : तीर्थक्षेत्रांची वैशिष्ट्ये** ५२

१. तीर्थक्षेत्रातील मातीत वाईट शक्तींना नष्ट करण्याची शक्ती असणे ५२

२. ग्रहणाच्या वेळी केलेले तीर्थस्नानही पुण्यकारक मानले जाते ५२

**प्रकरण ५ : तीर्थक्षेत्रांच्या संदर्भात संतांचे महत्त्व** ५४

२. ज्योतिर्लिंगे आणि संतांची समाधीस्थळे यांचे महत्त्व ५५

७. संतांनी तीर्थयात्रा करण्याचा उद्देश ५७

८. अवतारी सिद्धपुरुष तीर्थक्षेत्रे जागृत ठेवत असणे ५७

९. कुंभमेळ्यामध्ये खऱ्या संतांनी गंगेत स्नान केल्याने गंगा शुद्ध होणे ! ५८

१०. तीर्थक्षेत्रांपेक्षाही संत आणि गुरु महत्त्वाचे असणे ५९

१४. तीर्थक्षेत्रांचे पावित्र्य राखण्यातील महत्त्व ६१

**प्रकरण ६ : तीर्थयात्रा** ६४

२. तीर्थयात्रेचे महत्त्व, ५. लाभ, ७. यात्रा विधान ६५

८. यात्रेचा खरा उद्देश साध्य करण्यासाठी काय करावे ? ७६

**प्रकरण ७ : तीर्थयात्रेपेक्षा साधना महत्त्वाची** ८१

२. तीर्थयात्रेची मर्यादा आणि नामसाधनेची अपरिहार्यता ८१

६. मनातील सर्व विकार आणि नकारात्मकता नष्ट करून अन् निर्मळ अंत:करणाने तीर्थक्षेत्री जाणे आवश्यक ! ८४

८. तीर्थक्षेत्राची अनुभूती घेता येण्यासाठी साधना करणे अत्यावश्यक ! ८५

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ८४

## तीर्थक्षेत्रांचे माहात्म्य सर्वांपर्यंत पोहोचावे, यासाठी कार्यरत सनातन संस्था आणि श्रीसत्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ !



कन्याकुमारीपासून ते हिमालयापर्यंत चैतन्याचे स्रोत असलेली विविध तीर्थक्षेत्रे हे या परमपावन भारतभूमीला लाभलेले वरदानच आहे. देव-देवता, ऋषीमुनी आणि संत यांच्या परमकृपेने हिंदूंना मिळालेल्या अतिदुर्लभ अशा या तीर्थक्षेत्रांची सांप्रत काळातील स्थिती पहाता, लवकरच त्यांतील सात्त्विकता आणि चैतन्य नष्ट होऊन ती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, असे जाणवते. अशा या भीषण आपत्काळात आज हिंदूंना सात्त्विकता आणि चैतन्य प्रदान करणाऱ्या तीर्थक्षेत्रांची अत्यंत आवश्यकता आहे, हे लक्षात घेऊन हा अनमोल ठेवा जपण्याची धडपड सनातन संस्था करत आहे. महर्षींचा कृपाशीर्वाद लाभलेल्या सनातनच्या श्रीसत्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ या महर्षींच्या मार्गदर्शनानुसार विविध तीर्थक्षेत्री अहर्निश भ्रमण करत आहेत. दिवसाचा क्षणन् क्षण आणि देहाचा कणन् कण झिजवून त्या या तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेत त्यांचे माहात्म्य जाणून घेऊन आम्हाला सांगत आहेत. श्रीसत्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ आणि त्यांच्या समवेत या दैवी दौऱ्यात सहभागी असणारे साधक यांना या तीर्थक्षेत्रांत पुष्कळ अनुभूती येत आहेत. तीर्थक्षेत्रांचे महात्म्य सर्वांना कळावे व भारतभूमीला वरदान असलेला तीर्थक्षेत्ररूपी ठेवा पुढील पिढीला ज्ञात व्हावा, यासाठी अपार कष्ट घेऊन त्या विविध तीर्थक्षेत्री जाऊन तेथील चैतन्यमय वस्तू आणि काही मूर्ती यांच्याविषयीची आध्यात्मिक माहिती व छायाचित्रे संग्रहित करत आहेत. तीर्थक्षेत्री जाऊन त्याचा खऱ्या अर्थाने आध्यात्मिक स्तरावर लाभ कसा करून घ्यायचा, हे सगळ्यांनाच त्यांच्या या दैवी दौऱ्यातून शिकता येईल. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले व महर्षी यांच्या कृपेने त्या त्यांच्या या दौऱ्यातील विविध तीर्थक्षेत्रांची माहिती, अनुभूती व छायाचित्रे यांच्या माध्यमातून प्रत्येकालाच या तीर्थक्षेत्रांचे दर्शन घडवत आहेत. त्यांच्या या दैवी दौऱ्यातील तीर्थाटनाविषयीचे लेख सनातन प्रभात नियतकालिकांतून सर्वांपर्यंत पोहोचवत आहोत. – **श्री. रोहित साळुंके, गोवा**

## मनोगत

‘तरति पापादिकं यस्मात्’, म्हणजे ज्याच्यामुळे पापादिकांतून तरून जाता येते, त्याला ‘तीर्थ’ म्हणतात. तीर्थक्षेत्र हे खऱ्या अर्थाने आपल्याला केवळ पापच नव्हे, तर सर्वांतून (भवसागरातूनही) तारून नेते. यासाठी त्याचे महत्त्व युगानुयुगे सांगितले जात आहे. तीर्थक्षेत्र म्हणजे मानवजातीचा उद्धार करणारे परमस्थान आहे; म्हणूनच हिंदु धर्म आणि संस्कृती यांत तीर्थक्षेत्रे अन् तीर्थयात्रा यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

तीर्थक्षेत्राची पूर्वपिठीका सहस्रो वर्षांची असल्याने त्याचे चैतन्य हे शाश्वत आणि चिरंतन रूपातच कार्य करत असते. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी त्या त्या देवतेचे अस्तित्व असल्याने आणि त्यामुळे तेथील चैतन्याचे प्रमाण अधिक असल्याने तेथे उपासना केल्यास भक्तांच्या सर्व कामना अल्प कालावधीत फलद्रूप होतात. तीर्थक्षेत्रातील देवतांच्या अस्तित्वाचा आणि चैतन्याचा मानवाला लाभ होऊन त्याच्यात सत्त्वगुणांची वृद्धी व्हावी, यासाठीच ईश्वराने तीर्थक्षेत्रांची निर्मिती केली आहे.

तीर्थक्षेत्रे ही समस्त मानवजातीला ईश्वरी ऊर्जा (शक्ती), चैतन्य, आनंद आणि शांती प्रदान करणारी अन् भावभक्ती वाढवणारी आध्यात्मिक केंद्रेच आहेत. मानवाच्या पारमार्थिक उन्नतीसाठी पोषक वातावरण सहजासहजी उपलब्ध करून देणाऱ्या या तीर्थक्षेत्रांत ईश्वराशी सतत अनुसंधानित रहाता येते. त्यामुळे तीर्थक्षेत्रे केवळ पर्यटनाची क्षेत्रे नसून समस्त मानवजातीसाठी ती अतिवंदनीय आणि पवित्र क्षेत्रेही आहेत. यासाठीच तीर्थक्षेत्रांचे माहात्म्य या ग्रंथात विशद केले आहे. तीर्थक्षेत्रांची निर्मिती, त्यांचे महत्त्व आणि वैशिष्ट्ये आदी विषयांवर या ग्रंथात विवेचन केले आहे. तसेच तीर्थक्षेत्रांच्या संदर्भात संतांचे महत्त्वही विविध उदाहरणांद्वारे या ग्रंथात स्पष्ट केले आहे.

तीर्थक्षेत्रगमन ही एक ‘साधना’ आहे. ती होण्यासाठी तीर्थक्षेत्री आल्यावर भावपूर्ण तीर्थस्नान करणे, देवतांचे दर्शन घेणे, दान-धर्म करणे, उपास्यदेवतेचा नामजप करणे, अशा विविध प्रकारे अधिकाधिक वेळ ईश्वराशी अनुसंधान ठेवणे अपेक्षित असते. असे केले, तरच आपल्याला

तीर्थयात्रा करण्याचा आध्यात्मिक स्तरावर लाभ होतो. तीर्थक्षेत्रांचा अधिकाधिक लाभ कसा करून घ्यायचा, हे आपणास या ग्रंथातून शिकायला मिळेल. यासोबतच तीर्थयात्रेचे महत्त्व, तीर्थयात्रा केल्याने होणारे लाभ, तीर्थयात्रेचा खरा उद्देश साध्य होण्यासाठी काय करावे ? इत्यादी माहितीही या ग्रंथात दिली आहे.

हा ग्रंथ वाचून तीर्थक्षेत्रांचे माहात्म्य सर्वांच्या लक्षात येवो, या वसुंधरेवरील तीर्थक्षेत्ररूपी श्रेष्ठ स्थानांची अनुभूती घेता येण्यासाठी साधना करण्याची तळमळ सर्वांमध्ये निर्माण होवो आणि तीर्थक्षेत्रांचा खऱ्या अर्थाने लाभ घेता येऊन सर्वांचा भक्तीभाव वृद्धींगत होवो, अशी ईश्वराच्या चरणी प्रार्थना ! – **संकलक**

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

---

## सनातनच्या दोन सद्‌गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्‌गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्‌गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.